CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ३ रा फोन २३०१०१ दिनांक १ डिसेंबर २०२५ सोमवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४ रु.

# गुंडगिरी, माफियांवर बुलडोझर कसा चालवायचा यासाठी फडणवीसांनी योगींकडे एक महिन्यासाठी ट्यूशन लावावी



बीड दि.३० (प्रतिनिधी):- राज्यासह बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी गुंडगिरी वाढली आहे. परवाचीच घटना सामाजिक कार्यकर्ते राम खाडेंवर जीवघेणा हल्ला झाला. कायद्याचा गुंडांना धाक राहिला नाही, जो तो धाक दाखवून गोरगरीबांना धमकावत आहे, लुटत आहे. राज्याचे मुख्यमंत्री आज प्रचाराच्या निमीत्ताने बीडमध्ये येत आहेत. फडणवीस साहेब तुमच्याकडे गृहखाते आहे. गुंडांना सुतासारखे सरळ करायचे असेल तर काय करावे लागते यासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडे आपण एक महिन्याची ट्यूशन लावा आणि मग तुम्हाला कळेल की बुलडोझर बाबा काय असतो. कायद्याचा धाक राहिला तरच समाजाची घडी व्यवस्थीत बसत असते.

### बीडच्या निवडणुकीवर मुख्यमंत्री काय बोलणार?

बीड नगर पालिकेची निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनली आहे. राज्याचे मुख्यमंत्री अजितदादा दोनदा बीडला येऊन गेले. वेगवेगळ्या भागात त्यांनी दोन सभा घेतल्या. आता शेवटच्या टप्प्यात म्हणजे मतदानाच्या २४ तास अगोदर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडमध्ये येत आहेत. आजच्या सभेत ते काय बोलणार? याकडे लक्ष लागून आहे.

बीड जिल्हयामध्ये दादागिरी, गुंडगिरीचे प्रमाण वाढले आहे. १५-२० वर्षाची बेरोजगार मुले चक्क कट्टे हातात घेऊन गोळीबार करतात, शनिवारी परळीत याच गुंडगिरीच्या प्रकारातून गोळीबार झाला. दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. हत्या, खून, दरोडे, लूटमार असे प्रकार समाजाला अस्थिर करतात. कायदा व सुव्यवस्था अबाधित रहात नाही, अनेक समस्या निर्माण होतात. यासाठी गृहखात्याने नेहमी दक्ष राहण्याची गरज आहे. मागच्याच आठवड्यामध्ये आष्टी मधील रहिवाशी असलेले सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. तलवारी, कोयते याचा वापर झाला. अजुनही ते रुग्णालयात उपचार घेत आहेत. या अगोदर दोन ते तीन वेळेस राम खाडेंवर अशाच स्वरुपाचे हल्ले झालेले आहेत. आपण काहीही केलं तरी कोणीही आपलं काहीही बिघडवू शकत नाही ही मानसिकता बळावत असल्याने गुंडगिरीचे प्रमाण वाढले आहे. कधी काळी उत्तर प्रदेशात अशीच गुंडगिरी होती. भर दिवसा अपहरण, मारामाऱ्या, गोळीबार, लूटमार अशा घटना घडल्या जायच्या परंतु योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी गुंड, माफिया यांच्या विरुद्ध मोहीम हाती घेतली. मागच्या ६-७ वर्षात अनेक कुख्यात गुंड ज्यांची परिसरात दहशत होती तेच सरकार चालवायचे. अशा गुंडांचा खात्मा केला, त्यांच्या अवैध बांधकामांवर बुलडोझर चालविले आणि जनतेत संदेश दिला जर कोणी अशा प्रकारचे कृत्य करुन कायदा हातात घेत असेल तर त्याची गय केली जाणार नाही. याचा परिणाम असा की उत्तर पान २ वर

## प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यातही शिफा बिलाल चाऊस यांना वाढता प्रतिसाद

### ना.अजित पवार यांची सभा होऊनही शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची सुनामी कायम

माजलगाव दि.३० (प्रतिनिधी) :- माजलगाव नगरपरिषद निवडणुकीत तुतारीची लाट दिवसेंदिवस प्रचंड वेग घेत आहे. प्रचाराचा अंतिम टप्पा सुरू असतानाही मेहरून शिफा बिलाल चाऊस यांची सुरुवातीपासून असलेली आघाडी अबाधित असून ती अधिक मजबूत होताना दिसत आहे.शरद पवार राष्ट्रवादीच्या वाढत्या जनसमर्थनासमोर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सर्वात मोठी सभा होऊनही शहरातील नागरिकांचे मत परिवर्तन करत नसल्याची स्थिती आहे.नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, महिला वर्गाचा प्रचंड ओढा आणि तरुणांचा जोश यामुळे तुतारीच्या गोटात मोठ्या आत्मविश्वासाचं वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान शहरभर एकच चर्चा आहे.ना कमल खिलेगा, ना घडी चलेगी, सिर्फ तुतारी की आवाज गूंजेगी..! माजलगाव नगरपरिषद निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्याकडे पोहोचला आहे.आरोप प्रत्यारोपाच्या फेऱ्यात पुढं सरकलेली ही निवडणूक आता निर्णायक वळणावर येऊन ठेपली आहे.आ.प्रकाश सोळंके यांची प्रचारातील दमदाटी चर्चेचा विषय पान २ वर

## मुस्लिम समाजाला मदत करण्याची मराठा समाजाची भावना

### प्रेमलता पारवे यांना मिळणार बळ



बीड दि.३० (प्रतिनिधी):- मराठ्यांच्या संघर्षाच्या मदतीचा हात देणा-या मुस्लिम समाजाच्या मुजिबभाईच्या सासु प्रेमलताताईंना मतदान रुपी आशिर्वाद दिला पाहिजे अशी भावना मराठा समाजात व्यक्त होत आहेत. मुस्लिम समाजाने मराठा आरक्षण मोर्चा वेळी मराठा समाजाला अन्न, पाणी वाटप केले होते, त्यांच्या सहकाऱ्याची परतफेड मराठा समाज करणार असून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांना विजयाकडे घेऊन जाणार असल्याची चर्चा मराठा समाजात होत आहे. बीड शहरात मराठा आणि मुस्लिम समाजाची साथ ही नेहमीच परस्पर विश्वासाची राहिली आहे. मराठा आरक्षणाच्या मोर्चाविळी जेव्हा मराठा समाजावर कठीण वेळ आली, तेव्हा सर्वात आधी आणि सर्वात मजबूत मदत मुस्लिम समाजाकडून मिळाली. मोर्चातील लोकांना पाणी, जेवण, व्यवस्था, सुरक्षा असे शक्य ते सर्वतोपरी मदत केली.

ज्यांनी आपल्या संघर्षाच्या काळात खंबीर साथ दिली, त्यांच्यासाठी आज पुढे येणे हीच खरी परतफेड आहे. महाराष्ट्राची ओळख परस्पर मदत आणि एकतेत आहे. हीच भावना पुढेही जपणे आवश्यक आहे. बीड नगरपरिषद पान २ वर

## मुख्यमंत्री फडणवीस यांची आज सभा

### प्रचंड संख्येने उपस्थित रहा -अशोक लोढा



बीड दि.३० (प्रतिनिधी):- बीड शहराच्या इतिहासात प्रथमच बीड नगर पालिकेत भाजपाची सत्ता येणार असून त्या दिशेने सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योतीताई घोमरे यांचा शहरात डोअर टू डोअर प्रचार भक्कमपणे सुरू आहे. निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात बीड शहर भाजपमय होत असून नगरपालिकेची सत्ता यावेळी बीडकर नागरिकांनी भाजपाच्या हाती सोपवण्याचा निर्धार केला आहे. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची येत्या १ डिसेंबर २०२५ रोजी बीड शहरात भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सभेने बीड नगरपालिकेसाठी भारतीय जनता पक्षाचे विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे त्यामुळे या सभेला प्रचंड बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे

बीड नगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचत असून शहरातील सर्व २६ पान २ वर

## बीडचा मतदार आमच्यासोबत - आ.संदीप क्षीरसागर

बीड दि.२९ (प्रतिनिधी):- सातत्याने आम्ही लोकांच्या अडीअडचणी सोडवितो व लोकांच्या संपर्कात असतो.



यामुळे सामान्य मतदार आमच्या सोबत असल्याने विजयाची तुतारी वाजणारच असे आ.संदीप क्षीरसागर यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि प्रभाग क्रमांक १, ३, ४ नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२९) सायंकाळी शहरातील चक्रधर नगर, मातोश्री मंगल कार्यालय, विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकांत प्रतिपादन केले. या सभेला मतदारांची आलोट गर्दी दिसून आल्याने बीड करांच ठरलं, तुतारी वाजणारच अशी चर्चा सुरू झाली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आघाडीच्या बीड नगराध्यक्षपदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांच्या व प्रभाग १ मध्ये बबीता सुधाकर जाधव, अशोक मारूती काळे यांच्या प्रचारार्थ चक्रधर नगर, पान २ वर




## ना.पंकजाताईंच्या विकास निधीवरच आ.प्रकाशदादा लठ्ठ झाले -डॉ.ओमप्रकाश शेटे

माजलगाव दि.३० (प्रतिनिधी):- लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबापेक्षाही १० पट पंकजाताई मुंडे यांनी खेचून



आणलेल्या विकास निधीवरच आमदार प्रकाश दादा लठ्ठ झाले असल्याचे मत आयुष्मान भारत मिशन चे राज्य समितीचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे. माजलगाव नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी गेल्या तीन-चार दिवसांपासून आयुष्यमान भारत मिशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी भाजप शिवसेना युतीच्या अध्यक्षपदाच्या उमेदवार डॉक्टर संध्या ज्ञानेश्वर मेंडके आणि भाजपाच्या नगरसेवकांच्या प्रभागातील निवडणुकीच्या प्रचारार्थ शहरात कॉर्नर बैठका प्रचार फेरीच्या माध्यमातून त्यांनी प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटीवर भर देताना दिसून येत आहे त्यांनी माध्यमांशी बोलताना शेटे म्हणाले की पान २ वर

## अमरनानांना बळ देण्यासाठी रेश्मा सरवदेंना मतदान करा







बीड दि.३० (प्रतिनिधी):- निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार प्रभाग क्रमांक ३ मधील ब चे मतदान २ डिसेंबरला होत असून अ चे मतदान २० डिसेंबरला होणार आहे. मागील महिनाभरापासून रामदास सरवदे आणि अमर नाना खांद्याला खांदा लावून वार्डात खिंड लढवित आहेत. या प्रभागातील एका प्रभागाचे मतदान उशिरा होत आहे. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी प्रभाग क्रमांक ३ मधील सर्व मतदारांनी रेश्मा रामदास सरवदे यांना भरघोस मतदान करुन अमर नाना यांना बळ द्यावे अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

रेश्मा सरवदे यांचे पती रामदास सरवदे मागील ६ वर्षापासून अमर नानां बरोबर ब प्रभागात पूर्ण वेळ कार्य करत आहेत. या प्रभागातील पान २ वर

### वार्ड क्रमांक ३ अ मधील मतदान २० डिसेंबरला

**निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार बीड शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील ब वार्डाचे मतदान हे २ डिसेंबर रोजी सर्वासोबत होणार आहे. मात्र प्रभाग ३ अ चे मतदान हे निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार २० डिसेंबर रोजी होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भात पत्रक जारी केले आहे. त्यामुळे प्रभाग ३ मध्ये २ डिसेंबरला ३ ब आणि नगराध्यक्षांसाठीचे मतदान होईल. ३ अ साठीचे मतदान २० डिसेंबरला होणार आहे.**

## सौ.अमृता भोसले यांची प्रभाग १७ ब मधून आघाडी

### मुकुंद भोसले यांच्या समाजकार्याचे जनतेतून कौतुक

बीड दि.३० (प्रतिनिधी):- गत १८ वर्षापासून शिवराजे जनकल्याण ग्रुप व धडाकेबाज आमदार संदिप भैय्या यांचे एकनिष्ठ खंदे समर्थक मुकुंद भोसले यांनी समाजसेवेसाठी रात्रंदिन स्वत:ला वाहून घेतलेले आहे. त्यांच्या या समाजकार्याचे जनतेतून कौतुक होत असून त्यांच्या पत्नी सौ.अमृता भोसले





याना यंदाच्या न.प.निवडणूक रिंगणात असून प्रभाग १७ ब मधून त्यांनी निर्णायक आघाडी घेतल्याचे चित्र आहे. तुतारी वाजवणारा माणसाचे चित्र हे घराघरात पोहचले असून भोसलेंच्या विजयाची तुतारी नक्कीच वाजणार यात शंका नाही.

तब्बल ८ वर्षानंतर नगर पालिकेच्या निवडणूका होत असून बीड मधील जनता आपल्या हक्काचा माणूस लोकप्रतिनिधी करण्यासाठी उत्सुक आहे. येत्या २ डिसेंबरला न.प.साठी मतदान होत असून या निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाला जनतेतून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. रा.कॉं.पवार गटाच्या वतीने प्रभाग १७ (ब)मधून सक्रिय सामाजिक कार्यकर्ते मुकुंद भोसले यांच्या पत्नी सौ.अमृता भोसले यांनी प्रचारात आता निर्णायक आघाडी घेतली असून विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. पान २ वर

## श्रीमती मीनाकाकू चौव्हाण यांची निवडणूक मतदारांनी हाती घेतली

### रेकॉर्डब्रेक रॅलीने परिसर दुमदुमला



बीड दि.३० (प्रतिनिधी):- शहरातील प्रभाग क्रमांक ५ मध्ये दिवंगत रणजितसिंह (भाऊ) चौव्हाण यांची स्मृती आजही येथील नागरिकांच्या मनात जिवंत आणि प्रभावी असल्याचे चित्र उमटत आहे. रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी पेठ बीड भागातील प्रभाग ५ मध्ये रॅली काढली असता भाऊंचे सर्वसामान्यांशी असलेले घट्ट नाते, विकासकामांबाबतची कटिबद्धता आणि लोकांशी असलेली आत्मीयता यामुळे त्यांच्या अनुपस्थितीतही जनतेचे प्रेम तेवढ्याच ताकदीने जाणवत आहे. याच भावनेतून प्रभागातील मतदारांनी या निवडणुकीत श्रीमती मीनाकाकू रणजितसिंह चौव्हाण यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा एकमुखी निर्धार व्यक्त केला आहे. रॅलीत सर्व मतभेद विसरुन नागरीक सामील झाले होते.स्व. रणजीतभाऊंना खरी आदरांजली म्हणजे मीनाकाकींना मतदान असे सांगत पान २ वर

# शहरामध्ये महिलांसाठी जागोजागी स्वच्छतागृह बांधणार महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या जाहीरनाम्याची चर्चा

बीड दि.३०(प्रतिनिधी):-बीड नगर पालिकेच्या निवडणूकीचा प्रचार सोमवारी थंडावणार असुन काही मोजक्या उमेदवारांनी जाहीरनामे प्रसिध्द केले परंतु महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या वतीने नगराध्यक्षपदाचे उमेदवार तोळणाबाई रमेशराव गोरे यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात शहरामध्ये जागोजागी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारले जातील हे नमुद केल्यामुळे या जाहीरनाम्याची सर्वत्र चर्चा होत आहे.

महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या वतीने तोळणाबाई गोरे यांच्या निवडणूक जाहिरनाम्यात १२ अभिवचन दिले आहेत परंतु येथील सर्वांचे लक्ष लागणारे वचन म्हणजे महिलांसाठी जागोजागी स्वच्छतागृह. बीड शहरामध्ये महिलांसाठी एका ठिकाणचे स्वच्छतागृह सोडले तर कुठेच स्वच्छतागृह नाही. यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांसह राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अनेकदा मागण्या केल्या. परंतु स्वच्छतागृह उभारले गेले नाही. यामुळे खेड्या-वाड्यातुन आलेल्या महिलांच्या मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आलेली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे महिलांच्या स्वच्छतागृहाचा प्रश्न कोणत्याही उमेदवाराच्या तोंडून ऐकायला मिळाला नाही. यामुळे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या जाहीरनाम्याची मात्र सर्वत्र चर्चा होऊ लागली आहे.

## एकापेक्षा जास्त विवाह केल्यास १० वर्षे जेल

गुवाहाटी दि.३० (वृत्तसंस्था):- आसाम विधानसभेने आसाम बहुपत्नीत्व प्रतिबंधक विधेयक २०२५ मंजूर केले आहे. हा कायदा सहाव्या अनुसूची क्षेत्रांना आणि अनुसूचित जमाती वर्गाला लागू होणार नाही. सरकारच्या मते या क्षेत्रांतील स्थानिक प्रथा लक्षात घेऊन सूट देण्यात आली आहे.पहिले लग्न वैध असताना दुसरे लग्न करणे हा गुन्हा असेल, ज्यासाठी ७ वर्षांपर्यंत कारावास आणि दंड आहे. पहिले लग्न लपवून दुसरे लग्न केल्यास शिक्षा १० वर्षांपर्यंत वाढेल. गुन्हा पुन्हा केल्यास प्रत्येक वेळी शिक्षा दुप्पट होणार आहे. विधेयकावरील चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षांना त्यांचे सुधारणा प्रस्ताव मागे घेण्याचे आवाहन केले. मात्र, एआययूडीएफ आणि सीपीआय (एम) च्या प्रस्तावांना सभागृहाने आवाजी मतदानाने फेटाळून लावले. या कायद्याच्या कक्षेत ते लोकही येतील जे बहुविवाहाला प्रोत्साहन देतात किंवा लपवण्यास मदत करतात. यात मुखिया, काझी, पुजारी, पालक इत्यादींचा समावेश आहे. अशा लोकांना दोन वर्षांपर्यंतची शिक्षा आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड लागेल.

## संधी द्या, वार्डाचा चेहरा बदलून टाकू -संध्या राजपूत

**बीड दि.३० (प्रतिनिधी):- येथील प्रभाग क्रमांक ८ मधून ८ अ चे भाजपचे अधिकृत उमेदवार राहुल गोपाळ गुरखुदे व ८ ब च्या उमेदवार संध्या राधाकिसनसिंग राजपूत असून त्यांनी भाजपचे उमेदवार विजयी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. एकदा संधी द्या वार्डाचा चेहरा मोहरा बदलून टाकू, प्रभागाचा विकास हाच आमचा ध्यास आहे. त्यासाठी कमळ चिन्हावर मतदान करावे असे आवाहन संध्या राजपूत यांनी केले आहे.**



**राजपूत यांनी जनतेसमोर जाऊन आपला वचननामा मांडला आहे. ज्यात नियमीत पाणी पुरवठा, दर्जेदार रस्ते, प्रत्येक गल्लीत स्ट्रीट लाईट, घंटागाडी, गल्लीत मोफत व्यायामशाळा, गरजुंना रेशन कार्ड काढून देणार, मुलांसाठी, ज्येष्ठांसाठी गार्डन, नागरिकांना बसण्यासाठी सार्वजनिक केंद्रे या व अन्य सुविधा देऊन वार्डाच्या विकासाचे लक्ष्य ठेवून काम करण्याचा निर्धार संध्या राजपूत यांनी व्यक्त केला आहे.**

# डॉ.चिंचोलकर यांचे राजकीय पत्रकारितेवरील पुस्तक आवर्जून वाचावे ; माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे

बीड दि ३० (प्रतिनिधी)- राजकारण आणि पत्रकारिता हे डॉ .रवींद्र चिंचोलकर यांचे पुस्तक राजकारण आणि पत्रकारितेच्या क्षेत्राचे चांगले विश्लेषण करणारे आहे . विद्यार्थी तसेच राजकीय क्षेत्रातील लोकांनी आवर्जून वाचावे व विविध विद्यापीठांच्या अभ्यासकमासाठी निवडले जावे असे मत भारत सरकारचे माजी गृहमंत्री सुशीपकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी सोलापूर येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या सभागृहात या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.प्रमुख वक्ते म्हणून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.सुधीर गव्हाणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत येळेगावकर, पुस्तकाचे लेखक डॉ रवींद्र चिंचोलकर,राजकीय विश्लेषक राजा माने,श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलगुडे तसेच संभाजीनगर येथील विद्या बुक पब्लिशर्सचे शशिकांत पिंपळापुरे यांची उपस्थिती होते. यावेळी पुढे बोलताना सुशीलकुमार शिंदे म्हणाले की डॉ . चिंचोलकर



यांच्या पुस्तकात राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय स्तरावरील राजकीय पत्रकारितेचा आढावा घेतलेला आहेच . याशिवाय पत्रकारिता कशी असावी, राजकारणात कोणते बदल घडायला हवेत यावरही भाष्य करणारे आहे. प्रा .सुधीर गव्हाणे म्हणाले की पूर्वीच्या काळात राजकीय क्षेत्रात 'गुन्हेगारी पाश्वभूमी असलेल लोक कमी होते . आता टे प्रमाण वाढत चालले आहे . राजकीय लोक, धनवान, गुन्हेगार आणि निवृत्त सनदी अधिकारी एकत्र येऊन लोकशाहीची वाट लावत आहेत . अशावेळी सर्वसामान्य माणसाची व पत्रकारांची भूमिका वाढते. निकोप लोकशाही निर्माण होण्यासाठी सामान्य माणसाने राजकारणाकडे सजगपणे पाहिले पाहिजे . डॉ चिंचोलकर यांचे पुस्तक महत्वपूर्ण असून त्याचे हिंदी व इंग्रती भाषेतही भाषांतर होण्याची गरज आहे.पुस्तकाचे लेखक डॉ.रवींद्र चिंचोलकर म्हणाले की,. पत्रकारितेत बदल घडविण्याची शक्ती आहे .सोलापुरातील पत्रकारांनी मिरवणुकातील डॉब्लीचा वापर बंद करण्याबाबत जागरूकता निर्माण केली त्यामुळे त्या कार्यास यश मिळाले . तरुणांनी राजकारणाचा तिटकारा न करता चांगले राजकीय नेते होऊन पुढे यावे . पत्रकारितेने राजकारणावर अंकुश ठेऊन त्याला योग्य दिशा देण्याचे कार्य करावे. साप्ताहिक महाराष्ट्रचे माजी संपादक सुनील पाटील म्हणाले की राजकारण आणि पत्रकारिता हे डॉ . चिंचोलकर यांचे पुस्तक राजकारण, पत्रकारिता, जनसंपर्क, समाजकारण यासंदर्भात समर्पक भाष्य करते . आजच्या काळात या पुस्तकाची गरज होती.अध्यक्षीय भाषणात प्रा .श्रीकांत येळेगावकर म्हणाले की सोलापूर जिल्हयात अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांच्यापासून लढावू पत्रकारांची परंपरा चालत आलेली आहे . पत्रकारिता अनेकदा एकच बाजू दाखविते हे चुकीचे आहे . राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनीही आपण देशाचे कार्य करतो याचे भान राखण्याची गरज आहे.प्रारंभी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक राजा माने यांनी डॉ . चिंचोलकर यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचा आढावा घेतला . डॉ . चिंचोलकर यांनी सोलापुरात पत्रकारांची पिढी घडविली असेही ते म्हणाले . मुद्रित ते डिजिटल पत्रकारिता या प्रवासात पत्रकारितेत मोठे बदल घडल्याचेही ते म्हणाले .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . संतोष पवार यांनी केले . मान्यवराचा सत्कार यावेळी झाला सुशील कुमारजी शिंदे यांच्या हस्ते लेखक डॉ . चिंचोलकर आणि प्रकाशक पिंपळापुरे यांचा सत्कार करण्यात आला आभार डॉ . अंबादास भासके यांनी मानले . या कार्यक्रमास बीडहून पत्रकार चिंचोलकर मामा, गटशिक्षणाधिकारी संतोष चिंचोलीकर तसेच चिंचोलीकर परिवार, विद्यार्थी, पत्रकार, नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते .

पान १ वरुन

### श्रीमती मीनाकाकू चौव्हाण यांची निवडणूक मतदारांनी हाती घेतली

मतदार मोठ्या संख्येने मीनाकाकींच्या पाठिशी उभे राहत असल्याचे दिसत आहे. रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रभाग ५ मध्ये येथील उमेदवार प्रकाश कानगावकर आणि मीनाकाकी रणजितसिंह चौव्हाण यांच्या प्रचारार्थ संयुक्त रॅली काढली होती. यावेळी प्रभागातील सर्वच घटकातून चौव्हाण कुटुंबीयांप्रती असलेले प्रेम दिसून आले. विशेष पाहता या रॅलीमध्ये महिलांनीसुद्धा पुढाकार घेत मीनाकाकींच्या प्रचारात सहभाग घेतला होता. गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या भेटीगाठी, कॉर्नर सभा, दारोदार जाऊन भेटी यामध्ये शुक्रवार पेठ, करीमपुरा, साळगल्ली, हिरालाल चौक, शनिवार पेठ, बुरुड गल्ली, रविवार पेठ, भुई गल्ली, बागवान गल्ली, धनगर पुरा आणि कुरेशी मोहल्ला या सर्व भागांतून मीनाकाकींच्या समर्थनाची जोरदार लाट उमटत आहे. प्रभागातील नागरिकांचा विश्वास आजही भाऊंनी केलेल्या कामांवर तितकाच भक्कम आहे. यावेळी विकासाचा वेग थांबू नये, कामांची सलगता खंडित होऊ नये यासाठी मीनाकाकींना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा एकमुखी निर्धार प्रभागातील नागरिकांनी केला. चौव्हाण कुटुंबाच्या कार्यपद्धतीकडे नागरिक विकासाचा विश्वास म्हणून पाहतात. युवक वर्ग असो, महिला मंडळे असो किंवा ज्येष्ठ नागरिक सर्वच गटांतून मिळणाऱ्या उघड पाठिंब्यामुळे प्रभाग ५ मध्ये चौव्हाण कुटुंबावरील विश्वास अधिक दृढ झाल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या निवडणुकीत मीनाकाकू चौव्हाण रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी होतील, असा आत्मविश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### फडणवीसांनी योगींकडे ट्यूशन लावावी

प्रदेशातील शांतता, सुव्यवस्थेची घडी बसली. लोकांमध्येही तशा प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. राज्यात स्थिरता, शांतता असेल तर समृद्धी आणि विकास झपाट्याने होतो. बीड जिल्ह्यात काय काय प्रकार झालेले आहेत हे सगळ्यांना माहित आहेत. कशा पद्धतीने गुंडगिरीचा वापर करुन दहशत माजविली जाते. या सर्व गोष्टी थांबवायच्या असतील तर मुख्यमंत्र्यांनी योगींच्या पावलावर पाऊल ठेवावं त्यांच्याकडून शिकवण घ्यावी आणि त्याचा वापर समाजाच्या भल्यासाठी करावा.

### मुख्यमंत्री फडणवीस यांची आज सभा

प्रभागातील ५२ उमेदवार आपल्या प्रभागातील नागरिकांच्या घरोघरी पोहोचून प्रभावीपणे प्रचार करत आहेत. नागरिकांनी ही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी यावेळी भारतीय जनता पक्षाला सत्तेत बसवण्याचा निर्धार केल्याच्या जनभावना शहरातील प्रभागा प्रभागात व्यक्त होत आहेत. शहरातील सर्व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते एक दिलाने नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ नागरिकांच्या गाठीभेटी घेत त्यांचे आशीर्वाद घेत आहेत अशी माहिती भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी दिली असून यावेळी बीड नगरपालिकेत भाजपाचे सत्ता येणार असा विश्वासही लोढा यांनी व्यक्त केला आहे.

लोढा यांनी म्हटले आहे की, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सक्रियतेने नगरपालिका निवडणूक 'विजयी भव'चा नारा घेऊन मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. बीड शहरात ठिकठिकाणी भाजपाच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांसाठी जाहीर सभा, कॉर्नर बैठका, पदयात्रा काढल्या जात असून तरुण युवकांसह महिला भगिनींसह नागरिकांना पर्यंत पोहोचत आहेत. याच अनुषंगाने येथे १ डिसेंबर रोजी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विजयी संकल्प सभा बीड शहरात आयोजित करण्यात आली आहे.या सभेच्या माध्यमातून बीड नगरपालिकेत भाजपाच्या विजयावर शिक्का मुहूर्त होणार आहे त्यामुळे या सभेला बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शहराध्यक्ष लोढा यांनी केले आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जनतेने भाजपाला सत्ता देण्याचा ठाम निर्धार केला आहे असा विश्वासही अशोक लोढा यांनी व्यक्त केला आहे.

### प्रेमलता पारवे यांना मिळणार बळ....

निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे या मुस्लिम समाजाचे शेख मुजिब यांच्या सासुबाई आहेत. त्यांना आपण आज मदत करण्याची गरज असल्याचे मराठा समाजात बोलले जात आहे.

### शिफा बिलाल चाऊस यांना वाढता पाठिंबा

ठरत आहे.तर धीम्या गतीने चालणारी भाजपा सुप्त लाटेच्या जीवावर आपलं नजीब आजमावण्याचा प्रयत्न करत आहे. या उलट शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसने मात्र थोडं ही गाफील न राहता ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे.प्रत्येक मतदारापर्यंत त्यांचा पोहोचण्याचा प्रयत्न तुतारीच्या उमेदवारांना फायदेशीर ठरताना दिसत आहे.तुतारी वाल्या माणसाच्या उमेदवारांना मतदारांचा मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता अंतिम क्षणीही घड्याळ आणि कमळाच्या बाबतीत चित्र बदलण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.माजलगावातील राजकारण तुतारीच्या दिशेने झुकत असल्याचे स्पष्ट संकेत दिसत असुन शिफा बिलाल चाऊस आज घडीला प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात ही आघाडीवरच असल्याचे प्रचारसभांमधून दिसत आहेत.

दरम्यान तुतारीच्या गोटात विश्वासाची आणि विजयाची हवा असून संपूर्ण शहरात एकच चित्र आहे.ना कमल खिलेगा,ना घडी चलेगी... सिर्फ तुतारी की आवाज गूंजेगी! हा नारा शहरातील कोपऱ्या-कोपऱ्यात घुमत आहे.

### अमर नानांना बळ देण्यासाठी रेश्मा सरवदेंना मतदान करा

हनुमान नगर, पॉवर लूम, रामतिर्थ आदी भागात करण्यात आलेली विकास कामे ही रामदास सरवदे यांनी उभा राहून करुन घेतलेली आहेत. राजकारणातील शांत, सुस्वभावी, सुसंस्कृत व्यक्ती म्हणून या भागात रामदास सरवदे हे सुपरिचीत आहेत. मतदारांनी आपला उमेदवार निवडत असतांना त्याचे एकंदरीत व्यक्तिमत्व, त्याचे काम पाहून आपल्या मदतीला तो किती धावून येतो याचे मुल्यांकन करुन मतदान करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

### मतदार आमच्या सोबत -आ.क्षीरसागर

प्रभाग ४ मध्ये भास्कर भारत कांबळे, मंगलाबाई संजय चांदणे यांच्या प्रचारार्थ मातोश्री मंगल कार्यालय, पेठ बीड आणि प्रभाग ३ मध्ये रवी जयमल्हार बागल, राधा आकाश घोरपडे यांच्या प्रचारार्थ विठ्ठल मंदिर चौक पेठ बीड येथे या तीन प्रभागाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आ.संदीप क्षीरसागर यांनी शनिवारी (दि.२९) सायंकाळी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असल्याने बीडच्या मतदारांच्या मनात तुतारी अन्‍मशालच असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावेळी बोलताना आ. संदीप क्षीरसागर म्हणाले की, मी आणि माजी आ.सय्यद सलीम आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरून काम करतो. लोकांच्या अडीअडचणी जाणतो, त्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे बीडचा सामान्य मतदार आमच्या सोबत आहे. त्यामुळे या नगरपरिषद निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मितताई विष्णू वाघमारे यांच्यासह सर्व उमेदवार निवडून येणार हे निश्चित आहे. सर्वसामान्य लोकांच्या आशिर्वादाने विजयाची तुतारी वाजणारच असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. यावेळी माजी आ. सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे व नगरसेवक पदाचे उमेदवार आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सौ.अमृता भोसले यांची प्रभाग १७ ब मधून आघाडी

मुकुंद भोसले यांनी पक्ष व शिवराजे जनकल्याण ग्रुपच्या वतीने प्रभागातील मुलभूत सुविधांसाठी प्रशासकिय पातळीवर मोठा लढा उभा केला होता. आ.संदिप क्षीरसागर यांच्या माध्यमातून प्रभागातील रस्ते, नाल्या, विकासकामे अत्यंत दर्जेदारपणे राबवले आहेत. प्रभाग क्रमांक १७ मध्ये मुकुद भोसले यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधत असून जनतेचा कौल त्यांच्या बाजूने स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे येत्या २ तारखेला सौ.अमुता भोसले यांच्या विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे.

### ना.पंकजाताईंच्या विकास निधीवरच आ.प्रकाशदादा लढु

नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये विरोधक हे एकमेकावर जी चिखल फेक करत आहेत त्या चिखल फेकी मध्ये मला पडायचे नाही जर मी पडलो तर त्याचे शिंतोडे माझ्या अंगावर येतील म्हणून मी त्यांच्या वादात पडत नाही आमच्या पक्षाने ज्या डॉक्टर संध्या मेंडके उमेदवार दिले आहेत त्या अत्यंत सक्षम त्यांच्याकडे वक्तृत्व नेतृत्व असे गुणसंपन्न असलेला हा उमेदवार आहे त्यांनी शहरातील हजारो मतदारांच्या गाठीभेटी घेतलेल्या आहेत म्हणून त्यांची आज लोकांमध्ये प्रेस निर्माण झाली असल्याचेही त्यांनी सांगितले आजपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांनी नगरपालिकेमध्ये शहराला जे उतरंड्याचे स्वरूप आणले आहे शहरांमध्ये जिकडे तिकडे प्लास्टिकच प्लास्टिक दिसत आहे प्लास्टिक मुळे नाल्या तुंबल्या आहेत प्लास्टिक मुळे जनावरांना आजार होत आहेत कॅन्सर सारखा भयान आजार ची लागण होऊ शकते जर आमची सत्ता आली तर माजलगाव शहराचा ड्रोनने फोटो काढून माजलगाव शहर स्वच्छ सुंदर शहरे म्हणून आम्ही बनवू आणि शहर विकासासाठी मी केंद्रातील एक हजार कोटी रुपयांचा निधी शेअर विकासासाठी अनिल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले या निवडणुकीमध्ये विरोधकांच्या बोलतापाला बळी न पडता निर्भयपणे भाजपाच्या संध्या ज्ञानेश्वर मेंडके यांना प्रचंड मताधिकाने विजयी करावं असे आवाहन ओमप्रकाश शेटे यांनी केले आहे.


**टि.सी. हरवला**

**शुभांगी भानुदास गुजर**
मु.पो.आर्वी ता.शिरुर (का.)
जि.बीड या नावाचा पिव्हीपी कॉलेजचा डी फार्मसी उत्तीर्ण टि.सी आर्वी-पाटोदा बस गाडीने प्रवास करताना हरवला आहे .
:: संपर्क ::
**डॉ. भानुदास रंगनाथ गुजर**
९०७५८४४२३७
P.P.



**दैनिक पार्श्वभूमी** दि.३०-११-२०२५

**नावात बदल**

**जुने नाव : मुख्तार वजीर पठाण**
**नवीन नाव :- मुख्तार वजीर शेख**
हे आहे.
पूर्ण पत्ता : शिफा मंजिल संभाजीनगर बालेपिर, नगर रोड, बीड.
पिन कोड ४३ ११ २२ (महाराष्ट्र)


# बीड जिल्ह्यातील मल्टीस्टेट ठेवीदारांचा आक्रोश पैसे कधी मिळणार

## ठेवीदारांच्या हितासाठी मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज

बीड दि.३० (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांचा घामाचा पैसा मल्टीस्टेट बँकांच्या घोटाळ्यांमुळे लुटला गेला असून, या ठेवीदारांचा न्यायासाठीचा लढा आजही सुरू आहे. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट, ज्ञानराधा, राजस्थानी, साईराम आदी बँकांमधील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारामुळे तब्बल २५ हजारांहून अधिक ठेवीदार आर्थिक संकटात सापडले आहेत. काहींनी आत्महत्या केल्या.

भांडे घासणाऱ्या श्रमिक भगिनींपासून ते निवृत्त कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वसामान्य जनतेचा कष्टाचा पैसा या बँकांमध्ये अडकला आहे. अनेक ठेवीदार मानसिक आणि आर्थिक तणावात दिवस काढत आहेत.

अडीच वर्षांपासून जिजाऊ मल्टीस्टेट बँकेचे ठेवीदार वर्गणी गोळा करून शासनदरबारी आणि न्यायालयीन पातळीवर संघर्ष करत आहेत. मात्र शासन आणि प्रशासनाचे काम अजूनही धिम्या गतीने चालू आहे. संचालकांची मालमत्ता पूर्णपणे जप्त न झाल्याने आणि एमपीआयडी अंतर्गत जप्त मालमत्तांचा लिलाव विलंबाने होत असल्याने ठेवीदारांचा रोष वाढला आहे.

बीड जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून, येथील हातावर पोट भरणाऱ्या जनतेने विश्वासाने मल्टीस्टेट बँकांमध्ये पैसा ठेवला. आज तीच जनता न्यायासाठी रस्त्यावर उतरली आहे. ठेवीदारांचा ठाम आग्रह आहे की,

या प्रकरणातील आरोपींना ठेवीदारांचे पैसे परत मिळेपर्यंत जामीन मिळू नये, आणि शासनाने तीव्र गतीने कारवाई करून दोषींवर कठोर शिक्षा करावी.

मल्टीस्टेट बँकांवर कायदेशीरदृष्ट्या राज्य सरकारचा थेट नियंत्रण नसले, तरी ठेवीदार हे महाराष्ट्रातीलच नागरिक आहेत. त्यांचा घामाचा पैसा लुटला गेला हा गुन्हा महाराष्ट्रातच घडला आहे. त्यामुळे त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे आणि न्याय मिळवून देणे ही राज्य सरकारची नैतिक व सामाजिक जबाबदारी आहे.

ठेवीदारांचा स्पष्ट संदेश राज्य सरकारने या प्रकरणात नुसता हस्तक्षेप करून भागणार नाही तर घोटाळेबाजांवर कठोर कारवाई करावी, ठेवीदारांना त्यांचा पैसा परत मिळवून द्यावा, आणि भविष्यात अशा मल्टीस्टेट बँकांच्या गैरव्यवहारांवर कायदेशीर अंकुश आणावा.

बीड जिल्ह्यातील मल्टीस्टेट ठेवीदार न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून ठेवीदारांचा विश्वास परत मिळवावा हीच जनतेची अपेक्षा!

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी काही तासांत जेरबंद

## पेठ बीड पोलिसांची कामगिरी

**बीड (प्रतिनिधी) - बार्शी नाका, इमामपूर रोड परिसरातील राहुल नगरमध्ये सख्या भावांमध्ये सुरू असलेल्या जमिनीच्या वादातून शुक्रवारी (दि. २९ नोव्हेंबर) रात्री घडलेल्या खुनाच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले होते. या प्रकरणातील आरोपीला पेठ बीड पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला जमिनीचा वाद काल रात्री चिघळला. यादरम्यान निशिकांत उर्फ पिनू शहादेव फरताडे यांनी लाकडी दांड्याने भाऊ सचिन शहादेव फरताडे यांच्या डोक्यात प्राणघातक वार केल्याची माहिती मृतकाच्या आईने दिलेल्या तक्रारीत नमूद केली आहे. गंभीर जखमी अवस्थेत सचिनचा मृत्यू झाला.या प्रकरणी गु.र.न. ३३८/२०२५ अंतर्गत कलम १०३(१), ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५१(३) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता; मात्र पेठ बीड पोलीस स्टेशनचे अंमलदार अजय सानप व अल्ताफ शेख यांनी राबवलेल्या शोधमोहीमेत आरोपीला काही तासांत ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले.



पोलिस पथकाच्या या जलद आणि तत्पर कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

पान ६ वरुन

### प्रभाग ५ अ मधील समस्या सोडवण्यासाठी सक्षम नेतृत्व

सहभाग दिसत आहे. नागरिकांच्या अपेक्षा आणि समस्यांना प्राधान्य देत विकासाचा नवा आराखडा तयार करून सत्यात उतरवण्याचा प्रयत्न सुरज भैय्या चुंगडे करत आहेत. सोबतच कोविड सारखी महामारी असो किंवा आत्ताची अतिवृष्टी असो सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रत्येक संकटात स्वतः समोर उभा राहून प्रश्न मार्गी लावतात आणि हेच नेतृत्व कौशल्यामूळे त्यांची ही निवडणुक जनतेने स्वतःच्या हातात घेऊन मोठ्या मताने विजयी करण्याचा निर्धार केला आहे.

### भ्रष्ट आणि विकास खुंटवणाऱ्या उमेदवारांना अनमोल मत देऊ

भवितव्याचा निर्णय आहे. पैशांची देवाणघेवाण, जातीधर्माचे प्रलोभन आणि खोट्या आश्वासनांचे जाळे पसरवणाऱ्या उमेदवारांना ठामपणे नकार देणे, ही प्रत्येक सजग मतदाराची जबाबदारी आहे. त्यांनी पुढे सांगितले की, स्वच्छ आणि जबाबदार नेतृत्व निवडले, तरच शहराचा विकास शक्य आहे. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही दबावाखाली बळी न पडता, योग्य आणि सचोटीनं काम करणाऱ्या उमेदवारांनाच मत द्यावे. गुंडगिरी करणाऱ्या उमेदवारांना आणि पुढाऱ्यांना रोखण्याची ही एक संधी असते. गुंडगिरीला जात नसते. त्यामुळे मतदाराने समर्थपणाने मतदान केले पाहिजे. ज्या ठिकाणी बोगस मतदान होत आहे, त्या ठिकाणी मतदारांनी उभे राहून बोगसगिरी थांबवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांना आज पर्यंतच्या काळामध्ये ज्या ज्या वेळी तुमच्याकडे सत्ता होती, त्या त्यावेळी काय विकास केला. शहरातील गल्ली बोळांमध्ये किती चिखल होतो, रस्ते किती खराब आहेत, वीस दिवसाला पाणी का येते ? हे सगळे प्रश्न विचारायला पाहिजेत. मतदारांनी प्रश्न विचारले नाही, तर लोकशाही संपत असते. त्यामुळे मतदारांनी पुढाऱ्यांना देखील असे प्रश्न विचारले पाहिजेत, असेही अॅड.देशमुख यांनी म्हटले असून जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

### बीडच्या प्रभाग १० मधुन

प्रभागासाठी उच्चशिक्षित नेतृत्वाची जोडीचे उमेदवार मिळाल्यामुळे प्रभाग क्र. १० मध्ये एक नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. यामूळे नागरिकांनी आजच असा निर्धार केला आहे. की नगराध्यक्ष म्हणून सौ.डॉ.ज्योती घुमरे व नगरसेवक म्हणून मंगेश अंबादास घोंगडे आणि सौ.भाग्यश्री अशोक तांबारे यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे सर्वानुमते ठरले आहे.

### बहादुरभाईमुळे उमेदवारांना मिळालं बळ

झाली आहे. विशेष म्हणजे मतदारांना काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचा जाहीरनामा पसंद पडल्याने अनेकांच्या प्रतिक्रिया बोलक्या दिसून येत आहेत. तेव्हा येणाऱ्या दोन डिसेंबरला मतदानाद्वारे जनता काँग्रेस- वंचित बहुजन आघाडीलाच बहुमताने निवडून देणार असल्याचे स्पष्ट जाणवत असल्याचेही वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव ड. संजय रोडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### सय्यद अशफाक,सौ.मनिषा उल्हास गिराम यांना मिळतेय मतदारांचा

मतदारांचा असल्याने येथील मतदार कोणाच्या ही भुलथापाना बळी पडणार नाही प्रभागाच्या विकासासाठी बीडचे आमदार संदिप भैय्या क्षीरसागर, मा.आ.सय्यद सलिम यांचे हात मजबुत करून या दोन्ही उमेदवारांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणुस चा जोरदार आवाज निघत असून मतदारांनी विजयाची मशाल ही पेटवली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १ डिसेंबर २०२५ पान -३

## चार वर्षीय ज़िकरा ज़ाकेर शेख अरबीमध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

बीड दि३० (प्रतिनिधी) - शहरातील प्रसिद्ध अंबर फॅमिली रेस्टॉरंट चे संचालक ज़ाकेर शेख यांची चार वर्षीय कन्या ज़िकरा ही अरबीमध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाली. याबद्दल तिचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.ज़िकरा शेख अरबी भाषेतून शिक्षण घेत आहे. नुकतीच तिची परीक्षा झाली. यात तिने चांगले गुण घेतले. परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व विद्यार्थिनींना कारंजा मस्जिद येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात हाफ़ीज़ साद यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यात ज़िकरा ज़ाकेर शेख हिचे ही स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिक्षक वृंदांसह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड - पार्श्वभूमीच्या वर्धापन दिनानिमित्त संपादक गंमत भाऊ यांचा सत्कार करताना तुकाराम पवार

## संवेदनांना हात घालून मतदारांची करतात दिशाभूल-शेख आर्शियन

बीड दि.३० (प्रतिनिधी)- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर होत असताना वार्ड क्रमांक १६ मध्ये निवडणूक प्रचाराला एक वेगळाच, पण वादग्रस्त कलाटणी मिळताना दिसत आहे. काही उमेदवारांकडून दिवंगत व्यक्तींचे नाव पुढे करून, त्यांच्या 'अधुऱ्या स्वप्नांचा' जाज्वल्य उल्लेख करत मतदारांची दिशाभूल करण्याचा व सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. मतदारांच्या भावना हाताळण्याचा हा प्रयत्न नागरिकांना मात्र पचनी पडलेला नाही. ''ज्या व्यक्ती आज हयात नाहीत, त्यांच्या नावावर राजकीय लाभ मिळवण्याचा खेळ सुरू आहे. अशी तीव्र प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते शेख आर्शियन यांनी व्यक्त केली.

वार्ड क्रमांक १६ मध्ये एकतर्फी लढत चांगलीच रंगली असली तरी काही उमेदवारांनी 'दिवंगतांचा आशीर्वाद' आणि 'त्यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करणार' अशी गोड बोलणी करत सहानुभूतीची लाट निर्माण करण्याचा डाव आखल्याचा आरोप केला आहे. याबाबत संतप्त आवाज उठू लागले आहेत. ''राजकारणाला त्याची जागा आहे. जी व्यक्ती आता हयात नाही, त्यांच्या नावाचा फायदा घेऊन मत मिळवणे केवळ नैतिकतेला धरून नाही. मुद्द्यावर बोला, कामे दाखवा, पण मृत व्यक्तींना राजकारणात ओढू नका,'' अशी कडक भूमिका अनेकांनी मांडली आहे. दरम्यान वार्ड क्र. १६ मध्ये एकतर्फी लढत होणार असल्याची चर्चा असून येथे तुतारीच वाजणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. नागरिकांच्या वतीने येथील राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

## उमेदवाराच्या प्रचारार्थ असलेल्या वाहनांच्या कर्णकर्कश भोंग्याने माजलगावकर वैतागले

माजलगाव दि ३० (प्रतिनिधी)- माजलगाव नगरपरिषद मतदान २ डिसेंबर रोजी होणार आहे. सध्या प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरु आहे. चार नगराध्यक्ष सह १४७ नगरसेवकपदासाठी उमेदवारांच्या गाड्या भोंग्याद्वारे कर्णकर्कश आवाजात प्रचार करत एकापाठोपाठ धावत असल्याने हा प्रकार नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. प्रचार करणाऱ्यांना डिसीबलची मर्यादा पाळायला कोण लावणार ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, शाळा परिसर, हॉस्पिटलजवळून जाणाऱ्या प्रचारगाड्यांमुळे रुग्ण, विद्यार्थी आणि वृद्धांना त्रास सहन करावा लागत आहे. परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असल्याच्या तक्रारी पालकांनी प्रशासनाकडे केल्या आहेत. शाळा आणि रुग्णालयाजवळ शांतता राखण्याचे नियम असूनही काही प्रचार करणाऱ्या गाड्यांकडून दुर्लक्ष होत आहे. डिजिटल स्क्रीन आणि मोठे स्पिकर लावून सजवलेल्या प्रचारगाड्या अरुंद रस्त्यांवर थांबल्याने वाहतूक कोंडी वाढत आहे. काही ठिकाणी प्रचारगाड्यांच्या आवाजावरून वादही निर्माण होत आहेत. निवडणूक आयोगाकडून निर्धारित ध्वनीमर्यादा आणि वेळेचे पालन काही गाड्यांकडून न झाल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.माजलगाव नगरपरिषद ची निवडणुक नऊ वर्षानंतर होत आहे. नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडणून द्यायचा असल्याने निवडणुकीची रंगत चांगलीच वाढत चालली आहे. नगराध्यक्ष पदासाठी चार तर नगरसेवकपदा च्या २६ जागेसाठी १४७ उमेदवारांनी निवडणूक रिंगणात आहेत. नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे संध्या ज्ञानेश्वर मेंडके तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून मेहरुनबी खलील पटेल आत्तार तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार यांच्याकडून चाऊस महरीन शिफा बिलाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून सोनाली गोपाळ पैंजण यांच्यात थेट लढत होत आहे.

## सुरज चुंगडे यांना वार्ड क्रमांक पाच मधून उत्तम प्रतिसाद

बीड दि ३० (प्रतिनिधी)- प्रभाग क्र.५ हा अत्यंत महत्त्वाचा वार्ड असून गेले अनेक दिवसापासून वार्डाचा विकास



झालेला नसून यंदा होऊ घातलेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत सुरज चुंगडे हे या प्रभागातून निवडणूक लढवत असून येथील नागरिकांच्या यांना वाढता पाठिंबा असून येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा विजय होणार असून मतदारांना त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहे..

बीड शहरातील प्रभाग क्रमांक पाच हे अत्यंत वरर्दळीचा वार्ड असून येथे भीमसृष्टी, शूरवीर महाराणाप्रता, महात्मा बसवेश्वर, राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचे पुतळे असून यांची खूप दिवसापासून दिवसापासून दयनीय अवस्था असून येथील पहिल्या लोकप्रतिनिधींनी यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे या भागातील यशवंत उद्यानाची देखील अवस्था अत्यंत बिकट असून याचा देखील आवाज कुठल्याच नगरसेवकांनी आत्तापर्यंत नगरपालिकेत उठवला नसुन लोकांनी आता सुरज चुंगडे यांच्या नावाला पसंती दर्शवली आहे .येणाऱ्या निवडणुकीत आता सुरज चुंगडे यांच्या धनुष्यबाणाला लोकांचा चांगला प्रतिसादातून आहे.

## ऊस दरवाढीबाबत युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलनास सोन्नाथाडी ग्रामपंचायतीचा पाठिंबा



माजलगाव दि ३० (प्रतिनिधी) -सद्या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला ऊस दरवाढ संदर्भात त्यांना समर्थ देण्यासाठी तालुक्यातील सोन्नाथडी ग्रामपंचायत ने एकमुखी पाठिंबा दिला असल्याचे उपविभागीय अधिकारी यांना कळवले असल्याचे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती अशोक डक , सरपंच विनय डक यांनी सांगितले

सद्यस्थितीत ऊस उत्पादनाचा खर्च अत्यंत वाढलेला असताना, कारखानदारांकडून कोणताही दर जाहीर करण्यात आलेला नाही. याचा तीव्र निषेध सोन्नाथाडी ग्रामपंचायत व्यक्त करते. युवा शेतकरी संघर्ष समितीने मांडलेल्या ऊसाची पहिली ३ हजार रुपये व अंतिम बिल ४ हजार रुपये या योग्य व न्याय मागण्यांचे आम्ही एकमुखी समर्थन करीत आहोत. वरील मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघत नाही तोपर्यंत ऊसतोड बंद,ऊस वाहतूक बंद आणि क्रशिंग बंद या आंदोलनात्मक कृतीस सोन्नाथाडी ग्रामपंचायत बहुमत्ताने पाठिंबा जाहीर करते. म्हणूनच आपण या गंभीर आणि तातडीच्या प्रश्नावर त्वरित मध्यस्थी करून शेतकऱ्यांच्या मागण्या निकाली काढाव्यात अशी विनंती ग्रामपंचायत सोन्नाथडी यांनी दि २९ रोजी येथील उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे निवेदनावर गावातील सरपंच विनय डक, अशाबाई वाघमारे,बंडू शिंदे,जयश्री गोटे,अशामती पवार,उर्मिला डक,भगवान कांबळे ,पांडुरंग वक्ते संतोष देशमुख,रघुनाथ डाके आदी सह गावातील नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

## पूर्वीच्या काळी शिक्षकांबद्दल मुलांमध्ये आदरयुक्त भीती होती-प्रा.डॉ.मुरकुटे

केज दि ३० (प्रतिनिधी)- पुर्वीच्या काळी शिक्षकांबद्दल आदरयुक्त भीती मुलांमध्ये होते, वृध्द आई -बाबांना सांभाळले जात होते. कारण त्या काळी मुलांना घरातुन, शाळेतुन शिक्षणा बरोबरच त्यांच्यात असणा-या मुल्यांना वाव दिला जायचा, घरातुन संस्कार व्हायचे आता ते दिसुन येत नाही. उच्च दर्जाचे शिक्षण मिळत, साधने, सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत पण कुठे तरी मुल्यांचे संवर्धन व वर्धन कमी होत असलेल्या सध्याच्या पिढीत जाणवत आहे. त्यामुळे एन.इ.पी. २०२० मध्ये मुल्य शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे आणि ते उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शिक्षकां मधले व विद्यार्थ्या मधिल मुल्य वर्धित करणे गरजेचे आहे. अन्यथा उच्च शिक्षण असेल पण संस्कार हिन व मुल्यहीन पिढी असेल म्हणून मुलांमध्ये असणा-या मुल्यांना शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातुन वर्धित करण्या साठी शिक्षकांवर ही जबाबदारी दिली आहे आणि ती आपण योग्य पद्धतीने पार पाडाल उद्याचे भावी नागरिक लोकशाहीतील जबाबदार संवेदनशील आणि मुल्याधिष्ठीत नागरिक व्हावेत हेच या प्रशिक्षणाचा उद्देश आहे असे मत प्रा.डॉ. मूरकुटेसर यांनी व्यक्त केले.जिल्हाशिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई आयोजित मुल्यवर्धन ३.० केज तालुकास्तरीय प्रशिक्षण साने गुरुजी निवासी विद्यालयात



सुरू झाले असून या प्रशिक्षणाचा उद्धाटन करताना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे वरिष्ठ अधिव्याख्याता प्रा.डॉ. मुरकुटे हे बोलत होते.यावेळी अॅड. उध्दवराव कराड, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, श्रीमती पठाण मॅडम, कार्यक्रमाचे आयोजक जयपाल कांबळे सर, अरुण शिंदे सर, मुल्यवर्धन नोडल अधिकारी भारत मदने, मुल्यवर्धन तालुका समन्वयक चंद्रकांत मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रशिक्षणास केज तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीला शिकवणा-या सर्व शिक्षकांना दि.२७-११-२०२५ ते १३-१२-२०२५ या कालावधीत पाच टप्प्यात हे प्रशिक्षण डायटच्या वतीने देण्यात येत आहे. यात एकूण बाराशे शिक्षक हे प्रशिक्षण कालावधीत घेणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपनर मॅडम यांनी केले तर प्रास्ताविक अरुण शिंदे सर यांनी केले व आभार मुंडे सर यांनी मानले.

## प्रभाग १४ मध्ये सुजात आंबेडकर यांच्या दौऱ्याने वंचितसाठी झाली वातावरण निर्मिती



बीड दि ३०(प्रतिनिधी) - बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १४ मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला प्रचंड गती मिळाली आहे. आतापर्यंत सुमारे ७ हजार मतदारांपर्यंत पोहोचत त्यांचा तिसरा प्रचार फेरा सुरू झाला आहे.आंबेडकर घराण्याचे युवराज सुजात दादा आंबेडकर यांनी पंचशील नगरमध्ये काढलेल्या भव्य रॅलीनंतर या प्रभागातील वातावरण अधिक तापले आहे. दरम्यान, 'कमळ फोडा' आणि 'घडी फोडा' असा संदेश काही विशिष्ट गटातून दिला गेल्यानंतर त्याचा सरळ फायदा वंचित बहुजन आघाडीच्या गॅस सिलेंडर या निवडणूक चिन्हाला मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. २०१९ च्या निवडणुकीमध्ये लोकसभेला उभे असणारे उमेदवार प्राध्यापक विष्णू जाधव यांनीही प्रचार सभेत सहभाग नोंदवला.

## गजानन (दादा) ची वाढवू आन बान शान; नगरपालिका निवडणुकीत निवडून देऊ फक्त धनुष्यबाण

बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील प्रभाग क्रमांक ०८ मध्ये घरोघरी जाऊन प्रचार करत उपस्थित राहून सर्वांशी सविस्तर संवाद साधुन शिवसेना पक्षाला मिळणारा



प्रतिसाद पाहता घरोघरी धनुष्यबाण विजयाची जान असे बोलले जात आहे. यानिमित्त मित्र परिवारांच्या गाठीभेटी घेऊन सवांद साधून प्रभाग क्रमांक ०८ मधील असंख्य तरुणांनी शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार केला असल्याचे दिसून येत आहे. प्रभागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवा नेतृत्व गजानन (दादा) दामोधर कदम धनुष्यबाण या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्या, असे बंडू उडान यांनी आवाहन केले. प्रभाग क्रमांक आठ मधील विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. पायाभूत सुविधा आणि मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी यापुढेही कटिबद्ध आहे. मात्र, त्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे लोकप्रिय, अधिकृत उमेदवार गजानन (दादा) दामोधर कदम धनुष्यबाण या चिन्हा समोरील बटन दाबून या उमेदवाराच्या पाठीशी आपला आशीर्वाद असू द्या. कारण, आपल्या सोबतीनेच प्रभागाचा सर्वांगीण विकास करायचा आहे. त्यामुळे या प्रभागातील माझ्या सुज्ञ माय-बाप जनता गजानन (दादा) सोबत उभी राहून आपला मतदान रुपी आशीर्वाद देईल, असा विश्वास दीपक कदम, राम घिगे, जगदीश वखरे, मेघनाथ काळे अक्षय आहेर सचिन उडान अक्षय वाघमारे विजय धोंगडे प्रमोद ढवळे व मित्र परिवार व बहुसंख्य मतदाराने व्यक्त केला आहे.

## गेवराई शहरात राष्ट्रवादीच्या महिला कार्यकर्त्यांनी केला विजयाचा निर्धार

गेवराई दि.३० (प्रतिनिधी) - गेवराई नगरपरिषद निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई महेश दाभाडे यांच्यासह प्रभाग ५ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला उमेदवार अंजूश्री महेश मोटे व गायकवाड अंकुश छगनराव यांनी मोटे गल्ली, लाड गल्ली, रंगार चौक, संभाजी चौक या परिसरामध्ये प्रचार फेरी काढून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या त्यांच्या या प्रचार फेरीला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. .या प्रभागातील महिला उमेदवार मोटे अंजूश्री महेश यांचे पती महेश उत्तम मोटे यांचा सामाजिक कार्यातील सहभाग व उत्तम नाना मोठे यांचा वारकरी संप्रदायातील संपर्क व सामाजिक उपक्रमात मोठ्या प्रमाणात असलेला सहभाग यामुळे या प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर मताधिक्य मिळवण्यासाठी हातभार लागणार आहे. या प्रचार फेरीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला कार्यकर्त्या मुक्ताताई आर्दड, पल्लवी गोगूले, योगिता तांबारे, किरण दाभाडे, शिला पैठणे, अनिता काळे, प्रीती दाभाडे, गीता दाभाडे, शोभा आवटे, आदींसह महिला पूरूष कार्कर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाली होते.

## संकट,अडचणी दूर होण्यासाठी गणेश गोरे यांनी केले अन्नदान



बीड दि ३० (प्रतिनिधी) -गजानन पंढरीनाथ मारणे महाराज यांचे सगळे विघ्न, संकट आणि अडचणी दूर व्हावेत या साठी चिमुकल्यांचा आशीर्वाद महाराजांना लागावा या साठी बीड शहरातील पाली या ठिकाणी असलेले अनाथ विद्यार्थ्यांचे माहेर घर आनंदग्राम (इन्फंट इंडिया) या ठिकाणी शंभर विद्यार्थ्यांना बीड चे युवा नेते,तसेच समाजसेवक गणेश गोरे यांच्या माध्यमातून शंभर विद्यार्थ्यांना अन्नदान करून या चिमुकल्यांचा आशीर्वाद महाराजांच्या आयुष्यात मिळावा आणि महाराजांच्या पुढील जीवनात सर्व विघ्न,संकट,अडचणी दूर व्हाव्यात या शुभेच्छा गोरे यांनी व्यक्त केल्या.

## राष्ट्रीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत कार्तिकी मिसाळने जिंकले कांस्यपदक

बीड दि ३० (प्रतिनिधी))- इटानगर, अरूणाचल प्रदेश येथे सुरू असलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन्स अकॅडमी बीड ची राष्ट्रीय पदक विजेती खेळाडू कु. कार्तिकी संदिप मिसाळ हीने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना १७ वर्षे वयोगटात ६८ किलो वजन गटात कांस्यपदक पटकावले आहे, अशी माहिती तायक्वांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र , मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली आहे.

तीने उत्तरप्रदेश, मनिपुर च्या प्रतिस्पर्धी खेळाडूंना पराभूत केले. चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीचा राष्ट्रीय खेळाडू ओंकार परदेशी याने देखील नुकतीच जम्मू काश्मीर येथे पार पडलेल्या १९ वर्षे वयोगटात राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत कांस्यपदक पटकावले आहे, तर समर्थ आंधळे याने देखील नुकतीच पंजाब येथे पार पडलेल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात महाराष्ट्र राज्य कॅडेट संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. गतवर्षी सार्थक भाकरे , यशस्वी चव्हाण , श्रवण तांबारे यांनी राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत नेतृत्व केले आहे. भारत सरकारच्या मान्यतेने राष्ट्रीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धांचे अरूणाचल प्रदेश सरकारने आयोजन केले आहे. या राष्ट्रीय स्पर्धा २६ ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान सुरू आहेत. हा खेळाडू बीड जिल्हा क्रीडा संकुलातील डॉ. अविनाश बारगजे यांच्या चॅम्पियन्स तायक्वांदो अकॅडमीचा खेळाडू आहे.

या खेळाडूला जिल्हा संघटनेचे मार्गदर्शक डॉ योगेश क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर , नितीनचंद्र कोटेचा, दिनकर चौरे, डॉ अविनाश बारगजे , जया बारगजे , बन्सी राऊत, भरत पांचाळ, सुनिल राऊत , डॉ. विनोदचंद्र पवार, मनेश बनकर, प्रसाद साहू, बालाजी कराड यांच्यासह जिल्हा संघटनेच्या सर्व वरिष्ठ खेळाडू ,सर्व पदाधिकाऱ्यांनी ओंकार याचे अभिनंदन केले आहे.

## जयदत्त क्षीरसागरांच्या सभांना उसळणाऱ्या गर्दीने भाजप उमेदवाराचा विजय निश्चित

बीड दि ३० (प्रतिनिधी) -बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे सर्व उमेदवार आघाडीवर असल्याचे संकेत मिळत आहेत.



भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुबरे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे, जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला आहे, जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या पाठिंब्याने राजकीय गणिते बदलू लागली आहेत.

जयदत्त आण्णा क्षीरसागर आणि महाराष्ट्र राज्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील सलोख्याचे संबंध भविष्यातील विकास प्रकल्पांसाठी बीडला मोठा फायदा करून देतील,

अशी अपेक्षा भाजप कार्यकर्त्यांमध्ये वाढू लागली आहे.शहरातील सर्वच प्रभागांत भाजपला मिळत असलेला उत्साहवर्धक प्रतिसाद, जयदत्त आण्णा क्षीरसागरांची बीड शहरात असलेली मजबूत पकड यामुळे भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ ज्योती घुबरे व सर्व नगरसेवक हे विजयाच्या उंबरठ्यावर असल्याचे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे.भाजपचा प्रचार वेगाने शिगेला पोहोचत आहे.

## गेवराई येथील भाजप कार्यालयाला ना.पंकजाताईंनी दिली सदिच्छा भेट

गेवराई दि.३० (प्रतिनिधी) :- गेवराई शहरातील जुने बसस्थानक येथील भाजप कार्यालयाला लोकनेत्या तथा मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी ना.पंकजाताई मुंडे यांच्या आगमनानंतर भाजपचे गेवराई तालुका समन्वयक श्रीकांत सानप यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जोरदारपणे स्वागत केले.

यावेळी पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना म्हटले की, गेवराईत कार्यकर्त्यांकडून मिळणारा उत्साहपूर्ण सन्मान हा माझ्यासाठी ऊर्जा देणारा असतो. भाजपचे हे स्थानिक कार्यालय नेहमी सर्वसामान्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कटिबद्ध आहे. हीच जनसेवेची परंपरा पुढेही सुरू राहावी या



सदिच्छा व्यक्त करतानाच गेवराई भाजपचे समन्वयक श्रीकांत सानप यांच्या कार्याची त्यांनी प्रशंसा

केली. यावेळी माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, माजीमंत्री बदामराव पंडित, भाजपचे नेते बाळराजे पवार, प्रकाशराव सुरवसे, अॅड.सुरेश हात्ते, प्रा.पी.टी.चव्हाण, तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, राजेश पवार, ज्ञानेश्वर खाडे, मनोज पाटील, उद्धव रासकर, अशोक शिंदे, साईनाथ सुरवसे, संतोष थोरात, विकास पवार, प्रदीप उगलमुगले, गणेश सातपुते, सुशील भोपळे, रामचंद्र कोळेकर, सुनील ढाकणे, मच्छिंद्र यादव, सतीष ढाकणे, रंजित शर्मा, पप्पू खेडकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मतदारांमध्ये पूर्ण पसंती ; नगरपरिषद निवडणुकीत प्रचार शिगेला

माजलगाव(प्रतिनिधी):- नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक सात (ब) चे शिवसेनेचे उमेदवार विठ्ठल भगवानराव मात्रे मतदारांशी थेट कनेक्ट होत.



डोर टू डोर प्रचाराला महत्व दिले आहे. दरम्यान, मतदारांमधून शिवसेना आणि धनुष्यबाणाला पसंती दिली जात आहे.

सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेले विठ्ठल भगवानराव मात्रे माजलगाव नगरपरिषद निवडणुकीत पूर्ण ताकदनिशी उभे राहिले आहेत. शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विकासात्मक व्हिजन घेऊन आपण निवडणुकीला सामोरे जात आहे. त्यामुळे विकास हाच आपला मुख्य अजेंडा असल्याचे उमेदवार विठ्ठल मात्रे यांनी बोलताना सांगितले. पाच वर्ष नगरसेवक म्हणून मात्रे यांना अनुभव आहे. नगरसेवक पदाच्या कार्यकाळात मात्रे यांनी अनेक विकासात्मक कामे केली. त्याची पोचपावती म्हणून मतदार स्विकारतील. आपला विजय कोणीच रोखू शकणार नाही, असा आत्मविश्वासही मात्रे यांनी बोलून दिखविला. दरम्यान शिवसेनेची विचारधारा लक्षात घेता आपण ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण आपण करत आलो आहे. आपण मूळ शिवसैनिक असून हिंदूह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंदजी दिघे साहेब, एकनाथजी शिंदे यांच्या विचाराचा वारसा पुढे नेत आहोत. त्यामुळे राजकारण नव्हे तर समाजकारण करण्यासाठी निवडणूक लढवत आहे, असे उमेदवार विठ्ठल भगवानराव मात्रे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

# आझाद क्रांती सेना व लहुजी क्रांती मोर्चाच्या वतीने संविधानाचे वाटप

केज दि ३०(प्रतिनिधी)- महात्मा फुले जयंतीचे औचित्य साधून आझाद क्रांती सेना व लहुजी क्रांती सेनेच्या वतीने संविधान पत्रिकेचे वाटप करण्यात आले. संविधान दिन व महात्मा फुले स्मृतीदिनाचे औचित्य साधून आझाद क्रांती सेना व लहुजी क्रांती मोर्चाच्या वतीने २८ नोव्हेंबर रोजी केज शहरातील अनेक मान्यवरांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नागरगोजे , केज पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक नितीन मांजरमकर साहेब, केजच्या पुरवठा विभागा च्या नायब तहसीलदार रामटेके मॅडम यांना संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक



बाबुराव गालफाडे सर, आझाद क्रांती सेनचे तालुका प्रमुख शरद थोरात, आझाद क्रांती सेनचे तालुका उपप्रमुख अनिल लोखंडे, आझाद क्रांती सेनेचे शहर प्रमुख इरफान पठाण, बाळासाहेब जोगदंड सर, एस. के. वैरागे, शाम गालफाडे, सूर्यकांत लांडगे, बाळासाहेब पोळ, लखन पोळ, भागवत जोगदंड, सतीश शिंदे, आश्रूबा खाडे, साहिल तांबोळी, ईश्वर बारगजे, अमन पठाण, गोविंद चौरे, इम्रान तांबोळी इत्यादी उपस्थित होते.

# महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त दीपक देशमुख, सौ.देशमुख यांनी केले अभिवादन

परळी दि.३०(प्रतिनिधी)- शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या पक्ष प्रचार कार्यालयात दीपक देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन केले. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक रणधुमाळीचा प्रचार सुरू असताना, प्रचारास काही दिवस असून ,एवढ्या



व्यस्ततेत त्यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना पक्ष प्रचार कार्यालयात अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# युसुफ वडगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये ॲड.कुपकर पाटील यांच्या उमेदवारीची मागणी

केज दि ३० (प्रतिनिधी)- तालुक्यातील सुर्डी गावातील झुंजार आणि लोकाभिमुख महिला. नेत्या म्हणून परिचित असलेल्या ॲड. मनीषा कुपकर पाटील यांच्या जिल्हा परिषद निवडणुकीतील संभाव्य उमेदवारीबाबत समाजातून मोठ्या प्रमाणावर मागणी वाढत आहे. शिवसंग्राम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले व्यापक काम तसेच अलीकडेच झालेल्या बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत महिला प्रतिनिधी म्हणून मिळवलेले घवघवीत यश लक्षवेधी ठरले आहे. मनीषाताई यांनी गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या हक्कांसाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आणि गरजू घटकांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. विविध सरकारी योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहोचवणे, शेतकऱ्यांच्या अडचणींना न्याय मिळवून देणे यासह अनेक सामाजिक उपक्रमांत त्यांनी अग्रणी भूमिका बजावली आहे. मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान जाळपोळी च्या प्रकरणांत अन्यायाने अडकलेल्या अनेक मराठी तरुणांचे मोफत जामीन करून देत त्यांनी त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा दिला. कोणत्याही वंचित, पीडित व्यक्तीने मदतीचे आवाहन केल्यास तात्काळ प्रतिसाद देणे ही त्यांच्या कार्यशैलीची ठळक बाजू मानली जाते.त्यांच्या तडफदार नेतृत्व शैलीमुळे, कायदेविषयक जाणिवे मुळे आणि लोकाभिमुख कार्यपद्धती मुळे केज तालुक्यातील युसुफ वडगाव जिल्हा परिषद सर्कल मध्ये त्यांच्या उमेदवारी बाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या सर्कलमधून जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांना संधी देण्यात यावी, अशी एकमुखी मागणी नागरिक महिला बचतगट, शेतकरी वर्ग व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंना स्मृतिदिनी



आष्टी दि ३० (प्रतिनिधी)- सत्यशोधक समाज संस्थेद्वारे समाज सुधारण्याचे व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने समाजातील स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी धडपडणाऱ्या ज्योतिबांना आष्टीत आ. सुरेश धस, युवा नेते अजय धोंडे यांच्या सह तालुक्यात ठिकठिकाणी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आदरांजली वाहिली आहे. अन्याय - अत्याचार पासून व गुलामगिरीतून तथाकथित शुद्रातिशुद्र समाजाची मुक्तता करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन ज्यांनी संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षणासाठी वेचले असे थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या आज १३५ व्या पुण्यतिथी निमित्त आष्टी शहरातील क्रांतीसुर्य महात्मा फुले चौकामध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेला आ. सुरेश धस, युवा नेते अजय धोंडे यांनी सकाळी पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, सरपंच अशोकमुळे, नगरसेवक अक्षय धोंडे, नगरसेवक शरीफ भाई नगरसेवक नाना राऊत, सुनिल रेडेकर, पवन विधाते सर, सुरज शिंदे सर, दत्ता बोडखे, शिवराज लगड, हर्षद धोंडे, भागवत धोंडे, माजी सरपंच मनोज धनवडे, चिंटूशेट अग्रवाल, स्वप्निल धोंडे, शरद धनवडे, दिपक निकाळजे, आदेश निमोणकर, अक्षय सायकड, ॲड. राजदीप निकाळजे, सचिन रानडे, पंकज सिदनकर, बाला कदम, शंकर धोंडे, शंकर डोमकावळे, संपत सायकड, किशोर भोपळे, राजेंद्र धोंडे, कृष्णा भोपळे, गणेश धोंडे, सानप सर, ग्रामपंचायत सदस्य शरद धनवडे, साईनाथ धोंडे, सुजित धोंडे आदींनी पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

# गेवराई नगर परिषदेची निवडणूक ठरविणार स्थानिक स्वराज्य संस्थेची दिशा

उमापूर दि ३० (प्रतिनिधी)- गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये सध्या प्रचाराची रणधुमाळी चालू असून यामध्ये सर्व राजकीय मंडळी आरोप प्रत्यारोप करून आपापली बाजू मांडताना दिसत आहेत. तर गेल्या दहा वर्षाचा विकास घेऊन बाळराजे पवार व माजी आमदार बदामराव पंडित ही आपल्या कामाचे व राजकीय वजन घेऊन प्रचार करताना दिसत आहेत. माजी आमदार अमरसिंह पंडितही दोन्ही नेत्यांची खिल्ली उडवत आपण आपली कार्यशैली बदलून मी तुमच्यापेक्षा जास्त काम करीत असून मी गेवराई तालुक्याचा विकास करून दाखवू शकतो त्याचबरोबर मी जनतेची व कार्यकर्त्यांची कामे करून शकतो मिही गेवराई तालुक्यातील विकास करून दाखवू शकतो हे मुद्दे घेऊन आमदार अमरसिंह पंडित जनतेसमोर आपल्या पार्टीच्या नगराध्यक्षांच्या प्रचारात आहेत या सर्व बाबी लक्षात घेता गेवराई नगर परिषदेची निवडणूक ही स्थानिक स्वराज्य संस्थेची दिशा ठरविणार असल्याचे राजकीय तज्ञाचे मत येत आहे.गेवराई नगर परिषदेची निवडणुकी हि मोठी निवडणूक म्हणून ग्रामीण भागातील जनता याकडे पाहत आहे त्याची प्रमुख कारणे म्हणजे या निवडणुकीमध्ये राजकीय वर्चस्व बघितले जाते की स्थानिक विकास बघितला जातो किं दबाव तंत्राचा वापर होतो का हेही ग्रामीण भागातील जनता बघणार आहे माजी आमदार लक्ष्मण (आण्णा) पवार यांनी आमदारकीच्या काळात आमदारकीचा उपयोग नुसता गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील गावापेक्षा हि गेवराई न.प. देला जास्तीचा झाला त्यामुळे ह्या निवडणुकीमध्ये जनता कशाला महत्व देते हे पाहावे लागणार आहे त्याचबरोबर गेल्या एकावर्षाचा विकास घेऊन माननीय आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित हे तहसीलमध्ये होणारी आडवणूकीतुन तेथील विविध प्रकारच्या अडचणी सोडविल्या तसेच प.स. मध्ये कामामध्ये अधिकार्यांकडुन करणाऱ्या अधिकाऱ्याकडून काम करून घेऊन जनतेच्या समस्या सोडवणे तसेच जनता दरबार घेऊन त्यांना वेळ देऊन जनतेचे प्रश्न मार्गी लावणे या कामाच्या जोरावर या निवडणुकीत काय परिणाम होतो का ? हेही ग्रामीण भागातील जनता पाहणार आहे तर राजकीय मंडळींच्या सभा घेऊन त्यांचा गेवराईच्या जनतेवर किती परिणाम होतो ही पाहणे गरजेचे आहे का ह्या निवडणुकीमध्ये काही जातीवादाचा या निवडणुकीत राजकीय समीकरणात बदल होतो का ह्यकडे ग्रामीण भागातील जनतेचे लक्ष लागले आहे हि सर्व समीकरणे पाहून गेवराई नगर परिषदेमध्ये कोण बाजी मारतो हे पाहूनच पुढील राजकीय दिशा ठरेल परंतु निवडणूक ही झाली तरीपण सत्ताधारी व विरोधक एकाच पक्षात असल्याने ग्रामीण जनता सध्या तरी बघायची भूमिका घेताना दिसत आहे

# गंभीर जखमी झालेला सौरभ कोतमिरेने बरे होताच घेतली संजय कोठारी यांची भेट

जामखेड दि.३० (प्रतिनिधी)- कर्जत रोडवरील झगडे पेट्रोल पंपाजवळ शुक्रवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात ओम्नी कारचा चालक सौरभ कोतमिरे (रा. नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर) गंभीर जखमी झाला होता. लक्झरी बस आणि ओम्नी कार (क्र. चक१२ ऋछ ७०७३) यांची समोरासमोर धडक होऊन ओम्नी कार रस्त्याच्या खाली कोसळली होती या अपघातातील गंभीर झालेली संजय कोठारी यांनी रुग्णालयात दाखल केले होते तेव्हा तो विलास होऊन दुरुस्त होतात त्याने जामखेडला येऊन सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांची भेट घेऊन म्हणून उपकर मानले. अपघाता वेळी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या चालक सौरभ कोतमिरे यांना त्यांनी तातडीने उचलून केवळ दहा मिनिटांत जामखेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, हाताचे तुकडे झाल्याने शस्त्रक्रिया शक्य नसल्याने त्याला , तेथून अहिल्यानगर आणि पुढे पुणे येथील संचेती हॉस्पिटलला हलविण्यात आले. तेथे उपचारानंतर सौरभची प्रकृती सुधारली.बरे झाल्यानंतर रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सौरभ कोतमिरे हे नातेपुते येथील घरी जाण्याच्या अगोदर कुटुंबीयांसह थेट सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या कार्यालयात भेटायला आले. या वेळी त्यांनी भावूक होत कोठारी यांचे मनापासून आभार मानले. त्यांच्या बरोबर विवेक कोतमिरे, नामदेव गोपने, अमोल नकाते,



अक्षय कोतमिरे उपस्थित होते. सौरभचा सत्कार युवा उद्योजक आनंद कोठारी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी शाहूल सानप ही उपस्थित होते. यावेळी बोलताना संजय कोठारी यांनी सध्या रोडचे काम सुरू असल्याने रस्त्यावर गाड्या आडव्या उभ्या केल्या जातात. म्बुलन्स चालवताना खूप अडचणी येतात. डिव्हायडर मधील खड्डयां मुळेही जीवितास धोका वाढतो. सर्वात मोठी समस्या म्हणजे गंभीर जखमी पडलेला असताना मदतीला पुढे येणारे कमी असतात असेही नमूद केले.तर सौरभ बरा होऊन भेटायला आला, हीच माझ्यासाठी मोठी बक्षीस आहे. मी नव्हे, भगवंत आपल्याकडून काम करून घेतो. प्रत्येकाने अशाचप्रकारे एखाद्याला मदत केली, तर समाज बदलू शकतो. समाधान आणि आनंद दोन्ही मिळते. असेही ते म्हणाले.तर आजपर्यंत ६ हजार ६०० लोकांचे प्राण वाचविण्याचे कार्य केल्याचे त्यांनी नमूद केले

# डॉ.गुट्टे महाराज लिखित ‘अंगणातलं देऊळ’ पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन



परळी दि ३० (प्रतिनिधी)- डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज लिखित अंगणातलं देऊळ या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा माजी मंत्री पंडितराव दौड यांच्या हस्ते झाला. यावेळी महाराष्ट्र दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, प्राचार्य डॉ. विश्वनाथ खेडकर, आदिनाथ गुट्टे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते माधव मुंडे, वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक संजय आघाव, परळी वकील संघाचे माजी अध्यक्ष ड. त्रिंबक गोलेर, मरळवाडीचे माजी सरपंच प्रभू आंधळे, हनुमंत गुट्टे, बाबुराव आघाव, संपादक बालाजी फड, तसेच दैनिक बातमीदारचे मुख्य संपादक महादेव गित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.प्रकाशनप्रसंगी बोलताना आध्यात्मिक उपासनेवर प्रकाश टाकणारी आत्मकथा म्हणजे अंगणातलं देऊळ होय. या पुस्तकातून स्वामीजींच्या जीवनप्रवासासोबतच घराघरांत रुजलेल्या संस्कारांची, श्रद्धेची आणि साधनेची मांडणी प्रभावीपणे झाली असून बाह्य दिखाव्यापेक्षा अंतःकरणातील भक्ती, साधेपणा आणि सातत्यपूर्ण उपासनेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे, असे माजी मंत्री पंडितराव दौंड यांनी नमूद केले डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांची यापूर्वी ओंकारेश्वर दर्शन, शंकराचे बिल्वदल, श्री गणेश स्तुती, सार्थ गणेश स्तुती, यशस्वी जीवनाचा मार्ग, मुक्ताई झाली प्रकाश, संत केदारी महाराजांची पंचक्रोशीतील महती, संत मुक्ताई पालखी सोहळा, जीवन सार सूत्र, द पाथवे टू अ सक्सेसफुल लाईफ, मनोविश्वाचा आध्यात्मिक प्रवास ही पुस्तके प्रकाशित झाली असून समाज, अध्यात्म आणि आत्मविकास क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची ही साक्ष असल्याचे म्हटले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीहरी गुट्टे यांनी प्रभावीपणे केले, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते माधव मुंडे यांनी आभार मानले.



किट्टी आडगाव - पोलीस जमादार अशोक नलावडे व रमेश शिरसाट यांची पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना.पुरुषोत्तम मंदिर देवस्थान ट्रस्टचे विजुभाऊ गोळेकर, पत्रकार रामराव आगे,माजी सरपंच भाऊसाहेब गोळेकर,अविनाश धिरडे,महादेव घाटूळ,बबनदादा शिंदे आदी.

# डॉ.संध्या मेंडके यांना मत म्हणजे विकासाला मत – विलास नेमाने

माजलगाव दि ३०(प्रतिनिधी):- माजलगाव नगरपरिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये भाजप सेना युतीच्या उमेदवार डॉ .संध्या ज्ञानेश्वर मेंडके निवडणुकीमध्ये सक्षम उमेदवार आहेत त्यांना मत म्हणजे विकासाला मत असल्याचे मत ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांनी व्यक्त केले आहे. माजलगाव नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजप सेना युतीने डॉक्टर संध्या ज्ञानेश्वर मेंडके हे उच्चशिक्षित कार्यक्षम कर्तुत्व वक्तृत्व असलेल्या उमेदवार आहेत यांच्या विरोधामध्ये इत्यादी घड्याळाचे जे उमेदवार आहेत ते एकमेकांवर जे आरोप करत आहेत ते त्यामधून ते त्यांचं कर्तृत्व ते दाखवत आहेत त्यामुळे विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता



या निवडणुकीमध्ये भाजप सेना युतीच्या उमेदवार संध्या मेंडके यांची निवडणूक ही मतदारांनी हातात घेतले असून या निवडणुकीमध्ये विरोधकांच्या भूलथापाला बळी न पडता निर्भयपणे संध्या ताई ला म्हणजे विकासाला मत आहे म्हणून आपले अमूल्य मत दिनांक २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी आपलं कमळ या चिन्हावरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजय करावं असे आव्हान ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांनी केले आहे.

# देवाभाऊ व पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली माजलगाव शहराचा कायापालट करणार

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी भाजपच्या प्रचाराची मोट आवळली

माजलगाव (प्रतिनिधी): - माजलगाव नगरपालिका निवडणुकीत डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी भाजपाच्या प्रचाराची मोट आवळली असून मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. केंद्रात व राज्यात आपले सरकार आहे, त्यामुळे शहराच्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव शहराचा कायापालट करणार असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. माजलगाव शहरातील प्रत्येक वार्डात डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी झंजावाती दौरा केला. गल्लीबोळात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा केल्या. तसेच सामान्य लोकांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती असलेल्या डॉ.शेटे यांनी नागरिकांना शहराच्या सर्वांगीण विकासाचा शब्द दिला. तसेच शहराच्या प्रगतीसाठी आपल्याकडे असलेल्या विविध संकल्पना त्यांनी मांडल्या. माजलगाव ला मराठवाड्यातील सर्वात सुंदर शहर बनवण्याचा आपला मनोदय असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. शहरात अनेक ठिकाणी झालेल्या डॉ. शेटे यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचा अध्यक्ष म्हणून महाराष्ट्रात फिरत असलो तरी 'माजलगावचा भूमिपुत्र' हीच माझी ओळख आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. मात्र राज्यातील इतर शहराकडे



पाहिल्यावर विकासाच्या बाबतीत आम्ही किती मागे आहोत हे लक्षात येते. आजपर्यंत शहराच्या विकासासाठी आलेला निधी कुठे गेला ? व त्याचे काय झाले ? याच्या खोलात न जाता मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब व पर्यावरण मंत्री. मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या कुशल नेतृत्वाखाली आम्ही शहराचा कायापालट करण्यासाठी काय करू शकतो ? आमच्या संकल्पना काय आहेत ? यावर चर्चा करणे उचित होईल. आरोप - प्रत्यारोप व एकमेकांचा खालच्या पातळीवर जाऊन उद्धार करणे ज्याचे त्याला लखलाभ असल्याचेही डॉ.शेटे म्हणाले.एकंदरीत डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या रॅली व सभांनी प्रचारात रंगत आणली आहे. सर्वच वार्डात भाजपमय परिस्थिती निर्माण झाल्यामुळे भाजपचा एकतर्फी विजय होईल अशी मतदारांमध्ये उघड बोलले जात आहे. सर्व कार्यकर्ते एक दिलाने कामाला लागले असल्यामुळे नगरपालिकेवर नक्कीच भाजपाचा झेंडा फडकला जाईल यात शंका नाही.

# तुतारी चिन्हावर मतदान करा ; भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आवाहन

बीड दि.३०(प्रतिनिधी)- बीड नगरपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार) पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीमती स्मिता विष्णू वाघमारे यांना पाठिंबा दिला असून शहरातील एकूण २६ प्रभागातील ५२ उमेदवारांनाही निवडून येण्यासाठी मतदारांनी नगराध्यक्ष पदासाठी आणि वार्ड नंबर साठी 'तुतारी' या चिन्हावर मतदान करावे असे आवाहन केले आहे. भाजप आणि मित्र पक्षाच्या राजवटीचे केंद्र आणि महाराष्ट्रातील अनुभव लक्षात घेता सत्तेसाठी सर्वकाही असा कारभार चालू आहे. कमळाची मित्र असणाऱ्या घड्याळाला बरोबर जमत नाही हे एक उदाहरण झाले. विशेष म्हणजे जनविरोधी आर्थिक, सामाजिक धोरणे असणाऱ्या भाजप आणि त्यांच्या मित्रांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठीची मतदारांची जबाबदारी आहे. देशांतर्गत देशाचे आपसात तिरस्काराचे वातावरण निर्माण करून त्याचप्रमाणे हिंदुत्वाच्या संरक्षणाचे नाटक निर्माण करून भाजपाची मंडळी अल्पमताने सत्तेमध्ये बसलेली आहे. याचे भान ठेवून मतदारांनी ही विषवल्ली मुळासकट उपटून फेकून द्यावी. त्यासाठी प्राप्त परिस्थितीमध्ये बीड नगरपरिषद निवडणुकीसाठी तुतारी या चिन्हावर बटन दाबून त्यांना विजयी करावे. अशी आवाहन भाकपच्या वतीने करण्यात आले आहे. प्रसिद्धी पत्रकावर कॉम्रेड नामदेव चव्हाण, कॉ भाऊराव प्रभाळे, कॉम्रेड ज्योतीराम हूरकुडे, यांची नावे आहेत

## प्रभाग १३ च्या कॉर्नर बैठकीला आले सभेचे स्वरूप

# सय्यद अफसानाबी व उषा लांडगे यांचा विजय आजच निश्चित

माजलगाव (प्रतिनिधी):-नगर पालिकेची निवडणूक सद्या अंतिम टप्प्यात अली असून येथील प्रभाग १३ चा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अधिकृत उमेदवार सय्यद अफसानाबी सलीम व उषा अशोक लांडगे यांच्या प्रचारार्थ येथील आझाद नगर येथे एका कॉर्नर सभेचे आयोजन केले होते मात्र ही कॉर्नर बैठकीचे रूपांतर खूप मोठ्या जाहीर सभेत झाल्याने येथील दोन्ही उमेदवार आजच विजय झाल्याचे दिसून येत आहेत तर विरोधी उमेदवाराना या भागातील मतदार घराचा रस्ता दाखवणार असल्याचे सांगत आहेत. शहरातील अध्यक्ष व २६ नगर सेवका साठी दि २ डिसेंबर रोजी मतदान होत असून या पार्श्वभूमीवर काल शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी कडून प्रभाग १३ च्या उमेदवार व येथील सामाजिक कार्यकर्ते सय्यद सलीम बापू यांच्या सुविज्ञ पत्नी सय्यद अफसानाबी सलीम बापू व येथील तरुण शिक्षक बंधू अशोक लांडगे सर यांच्या पत्नी उषा अशोक लांडगे निवडणूकी साठी उभ्या आहे त्यांच्या प्रचारार्थ काल शहरातील आझाद नगर येथे सहाल चाऊस,बाबुराव पोटभरे ,नारायणराव डक ,श्रीहरी मोरे, सलीम बापू यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठक आयोजित केली होती मात्र या बैठकीचे रूपांतर एका भल्या मोठ्या जाहीर सभेत झाले या वेळी सहाल चाऊस यांनी आपले या भागावर विशेष लक्ष असून येथील



गोरगरीब जाणतेच्या कल्याना साठी आपण आमचे शिफा बिलाल चाऊस या नगराध्यक्ष पदासाठी तर सय्यद अफसानाबी सलीम व उषा अशोक लांडगे यांना नगर सेवक पदासाठी आपण मतदान रुपी आशिर्वाद दावेत अशी विनंती केली तर बाबुराव पोटभरे यानी आपण कायम या भागासाठी आपल्या घराचे दरवाजे उघडे ठेवले आहेत लवकरच गौतम नगर मध्ये स्वखर्चाने एक भव्य पुतळा उभारू असा शब्द देत आम्हाला भरघोस मताची लीड देण्याचे आव्हान केले.































बीडच्या प्रभाग १० मधुन

# भाजपचे मंगेश घोंगडे व भाग्यश्री तांबारेंना विजयी करण्याचा मतदारांचा निर्धार

## उच्चशिक्षीत डॉक्टर आणि वकील यांच्या उमेदवारीमुळे जनतेत





बीड (प्रतिनिधी) : बीड नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या बीड शहरात निवडणूक रणधुमाळी सुरू आहे. आरोप प्रत्यारोपाच्या वातावरणात निवडणुकीचे वातावरण तापल्याचे दिसत आहे. पण प्रभाग क्रमांक १० मध्ये वेगळेच चित्र पाहावयास मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या रणधुमाळीत भारतीय जनता पार्टी ही पहिल्यांदाच सर्व च्या सर्व उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरून ही निवडणूक स्वबळावर लढवत आहे. तशातच भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ.डॉ.ज्योती रवींद्र घुमरे याही प्रभाग क्रमांक १० मधून येतात त्याचसोबत भारतीय जनता पार्टी कडून नगरसेवक पदाचे उमेदवार मंगेश अंबादास घोंगडे (अ) व सौ.भाग्यश्री अशोक तांबारे (ब) हे उच्चशिक्षित नगरसेवक पदाचे उमेदवार याच प्रभाग क्र.१० मधून उभे आहेत.डॉ.योगेश (भैय्या) क्षीरसागर व सौ.डॉ.सारिका ताई योगेश क्षीरसागर यांचे अत्यंत विश्वासु असणारे ॲड.नागेश तांबारे यांच्या वहिनी सौ.भाग्यश्री अशोक तांबारे या निवडणुकीसाठी उभ्या आहेत. नागेश तांबारे हे गेली १५ वर्षे पासून क्षीरसागर यांचे एकमेव ,खंदे समर्थक म्हणून बीड शहरात प्रचलित आहेत. ते स्वतः पेशाने बीड जिल्हा न्यायालयात वकील म्हणून कार्यरत आहेत. एकीकडे नागेश तांबारे सारख्या उच्चशिक्षित वकील व याच प्रभागातून नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.डॉ.ज्योतीताई रवींद्र घुमरे या असल्यामुळे

पान २ वर

## प्रभाग ५ अ मधील समस्या सोडवण्यासाठी सक्षम नेतृत्व सुरज चुंगडे यांना विजयी करण्याचा मतदारांचा निर्धार


# उगवत्या सुरजला मिळतोय प्रतिसाद



**मतदार म्हणतात 'सुरजभैय्या' हक्काचा माणुस**

**बीड दि.३०(प्रतिनिधी):- बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत प्रभाग ५ अ मधून शिवसेनेचे उमेदवार सुरज भैय्या चुंगडे यांच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रभागातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत समस्या नागरिकांनी उघडपणे मांडल्या आहेत.**

प्रभागात नाल्यांची साफसफाई होत नसणे, कचरा गाडी कधीही न येणे, पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या, तसेच पथदिव्यांची अकार्यक्षमता यामुळे रहिवासी हैराण झाले आहेत. विरोधकांच्या कारभाराविषयी व कंकलेश्वर मंदिर सारख्या भावनिक विषयी झालेले भ्रष्टाचार यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिक म्हणतात,या सगळ्या समस्या आम्हाला रोज सहन कराव्या लागतात, पण विरोधकांनी पाच वर्षांत काहीच काम केले नाही. नागरिकांचा ठाम विश्वास आहे की, सुरज भैय्या चुंगडे हे हक्काने काम सांगता येणारे, लोकांसाठी सहज उपलब्ध आणि जबाबदार माणूस आहेत. त्यामुळेच या निवडणुकीत मतदारांनी आपली जबाबदारी स्वतःच्या हातात घेतली असून, या वेळी विकासासाठी योग्य उमेदवाराला विजयी करूनच आणणार, असा निर्धार व्यक्त केला आहे. पदयात्रा, भेटीगाठी आणि छोट्या सभांमध्ये मोठ्या संख्येने महिलांचे, तरुणांचे आणि ज्येष्ठ नागरिकांचे पान २ वर










प्रभाग क्र.८ च्या विकासासाठी

# सय्यद अशफाक,सौ.मनिषा उल्हास गिराम यांना मिळतेय मतदारांचा भरभरून साथ

बीड दि.३०(प्रतिनिधी):- शहरातील प्रभाग क्र.८ मधील अपूर्ण राहिलेले विकास कामे पुर्ण करण्यासाठी प्रभागातील मतदारांनी शरदचंद्र पवार आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या दोन्ही उमेदवारांना भरभरून मतदान करून विजय करण्याचा विळाच उचलला आहे. या प्रभागात काही ठिकाणी सिमेंट रस्ते, आणि पाईपलाईनचे काम बाकी असून प्रभात असून सोयीसुविधा मिळावे याकरीता शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले सय्यद अशफाक सय्यद मुहम्मद सिद्दीक (मुन्ना भाई) यांचे चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस तसेच शिवसेना उध्दव ठाकरे यांच्या पक्षाचे अधिकृत उमेदवार असलेले प्रा. सौ. मनिषा उल्हास गिराम यांचे मशाल या चिन्हा समोरील बटन दाबवून त्यांना विजय करण्याचे ठरवले आहे. गेल्या चार पाच दिवसापासुन या दोन्ही उमेदवारांनी सर्व मतदारांची गाटी भेटी घेतली अनेकांनी आशिर्वाद ही दिले हे प्रभाग उच्च शिक्षित पान २ वर

# भ्रष्ट आणि विकास खुंटवणाऱ्या उमेदवारांना अनमोल मत देऊ नका-ॲड.अजित देशमुख



बीड दि ३० (प्रतिनिधी)- समाजात विकासाची वाट रोखणाऱ्या भ्रष्ट, गुंड, लबाड आणि जनतेची फसवणूक करणाऱ्या उमेदवारांना मतदानातून धडा शिकवणे, हीच खरी लोकशाहीची ताकद असल्याचे स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष अजित एम देशमुख त्यांनी स्पष्ट केले. देशमुख म्हणाले की, मत हे केवळ बटण दाबणे नाही, तर आपल्या परिसराच्या पान २ वर







भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव निवडणुक चिन्ह | बटन |
|---|---|---|
| ४ | घुंबरे ज्योती रवींद्र | |

प्रभाग क्र. 9 (अ) चे नगरसेवक पदाचे अधिकृत उमेदवार

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव निवडणुक चिन्ह | बटन |
|---|---|---|
| 1 | कुटे जयश्री मच्छिंद्र | |

प्रभाग क्र. 9 (ब) चे नगरसेवक पदाचे अधिकृत उमेदवार

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव निवडणुक चिन्ह | बटन |
|---|---|---|
| 1 | गायकवाड शितल दत्ता | |

नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना "कमळ" या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजयी करा..!

मतदान दिनांक : मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५ । वेळ: सकाळी ७.३० मि. ते सायं. ५.३० मि.पर्यंत

प्रकाशक : प्रदिप विठ्ठलराव वनवे
मुद्रक : आधार क्रिएशन,बीड

आपलाच :- दत्ता गायकवाड पाटील

नगर परिषद, बीड सार्वत्रिक निवडणूक २०२५ मशीन नं.१
'एक मत द्यावे' नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण प्रवर्ग -

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | निशाणी |
|---|---|---|
| 01 | कांबळे रजनी अर्जुन | |
| 02 | कांबळे हिराबाई दिपक | |
| 03 | गोरे तोळणबाई रमेशराव | |
| 04 | घोमरे ज्योति रवींद्र | |
| 05 | जायभाये वृषाली नितीन | |
| 06 | जोगदंड सारिका विकास | |
| 07 | जोगदंड सुषमा अजय | |
| 08 | थोरात मंगल अशोक | |
| 09 | पवार प्रणीता राजेंद्र | |
| 10 | पवार विद्या अनिल | |
| 11 | पारवे प्रेमलता दादासाहेब | |
| 12 | मस्के करूणा मिलिंद | |
| 13 | मुने राधिका शिवाजी | |
| 14 | वडमारे प्रियंका आकाश | |
| 15 | वाघमारे कोमल रजनीकांत | |

नगर परिषद, बीड सार्वत्रिक निवडणूक २०२५ मशीन नं.२
'एक मत द्यावे' नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण प्रवर्ग -

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | निशाणी |
|---|---|---|
| 16 | वाघमारे समिता विष्णु | |
| 17 | वाघमारे संगीता सुरेश | |
| 18 | श्रृंगारे सुरेखा हर्ष | |
| 19 | स्वामी दिव्या महेश | |
| 20 | वरील पैकी एकही नाही | (NOTA) |

प्रभाग क्र.०९ (अ) नगरसेवक पदासाठी
'एक मत द्यावे' आरक्षण प्रवर्ग -

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | निशाणी |
|---|---|---|
| 01 | कुटे जयश्री मच्छिंद्र | |
| 02 | पोपळे पुष्प प्रभाकर | |
| 03 | पिंगळे रेखा रणजीत | |
| 04 | शेख सना समीर | |
| 05 | वरील पैकी एकही नाही | (NOTA) |

नगर परिषद, बीड सार्वत्रिक निवडणूक २०२५ मशीन नं.३
'एक मत द्यावे' प्रभाग क्र.०९ (ब) आरक्षण प्रवर्ग -

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | निशाणी |
|---|---|---|
| 01 | गायकवाड शितल दत्ता | |
| 02 | शेख अुर नजिरोद्दीन | |
| 03 | शेख शाहेद मुजफ्फर | |
| 04 | वरील पैकी एकही नाही | (NOTA) |